# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!

www.diwanews.com

आता डिजिटल स्वरुपात...
दिवा न्यूज़ची वेबसाईट सुरु..!
ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा
www.diwanews.com
आता कुठेही असा...दिवा न्यूज़ वाचा एका क्लिक वर..
epaper.diwanews.com

▶ वर्ष-३ ■ अंक-१ ■ epaper.diwanews.com ■ सोमवार, ७ ऑगस्ट २०२३ ■ पाने-८ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669


# ठाणे महापालिकेच्या झोपी गेलेल्या शिक्षण विभागाला जाग कधी येणार?



## दिव्यात भर रस्त्यात शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी पालकाला मारहाण केली

## अशी शिक्षण व्यवस्था कुठे असते का?

दिवा न्यूज सडेतोड/एस.के.

**ठाणे महानगरपालिका शिक्षण विभागाचे दिव्यातील शैक्षणिक सुविधांकडे दुर्लक्ष झाले आहे.दिव्यातील सर्वसामान्य माणसाच्या मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी कोणताच ठोस उपक्रम अथवा धोरण महापालिका राबवत असल्याचे पहायला मिळत नाही. पालिकेच्या शैक्षणिक सोयी सुविधा अपुऱ्या असल्याने येथील सामान्य माणूस आपल्या मुलांना खासगी मान्यता नसणाऱ्या शाळांमध्ये शिक्षणासाठी पाठवतो.**

### ▶ भरमसाठ फी आणि शैक्षणिक गुणवत्तेचा अभाव..

भरमसाठ फी आणि त्यात शैक्षणिक गुणवत्ता नसलेल्या शाळा या सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान करतात.दिव्यात सुमारे ४५ अनधिकृत शाळा असल्याचे प्रकरण नुकतेच उघडकीस आले होते. या प्रकरणाचे पुढे काय झाले?महापालिकेच्या शिक्षण विभागाचा कोणताही अधिकारी याचे उत्तर देऊ शकेल काय?ठाण्यात एसी कार्यालयात बसणाऱ्या अधिकाऱ्यांना दिव्यातील शैक्षणिक सुविधांचे काही पडलेले नाही.नुकतेच दिव्यात एक गंभीर प्रकरण समोर आले. आर एल पी नावाच्या शाळेतील शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी एका पालकाला भर रस्त्यात मारहाण केली.

### ▶ असे कुठे असतं का?

पालक आणि शिक्षक यांच्यात काहीही मतभेद झाले असतील तरी यावर भर रस्त्यात मारहाण हा उपाय कोणत्या शिक्षण व्यवस्थेत आहे.

आयुक्त साहेब तुम्ही आयएएस अधिकारी झालात...तुमच्या संपूर्ण शैक्षणिक काळात असा प्रकार कुठे पाहिलात का?असा विचित्र आणि तितकाच संतापजनक प्रकार दिव्यात घडला आहे.तुमच्या शैक्षणिक विभागाने काय कारवाई संबंधित शाळेवर केली हा आमचा प्रश्न आहे.

### ▶ आजकाल उत्तर देण्याची बांधीलकी अधिकारी वर्ग विसरून गेला आहे

मात्र ठाणे महापालिकेचे शिक्षण क्षेत्राशी संबंधित अधिकारी कर्मचारी आपल्या पाल्यांना अशा शाळांत प्रवेश मिळवून देतील काय?जर याचे उत्तर नाही असे असेल तर दिव्यातील सामान्य माणसाच्या मुलांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी पालिकेने पुढाकार घ्यायला हवा. किती सहज पणे दिव्यात अशा घटना घडतात आणि प्रशासन नावाची यंत्रणा या घटना विसरून देखील जाते.दिवा शहर हे ठाणे महापालिका प्रशासनासाठी फक्त एक भूभाग असेल पण येथे राहणाऱ्या माणसांच्या मुलांना आकाशाला गवसणी घालण्याची स्वप्न पाहण्याचा अधिकार आहे. पालिका प्रशासनाचे प्रमुख म्हणून आयुक्तांनी याकडे लक्ष द्यायला हवे.

### ▶ दिव्यात लोकसंख्या वाढली


तुलनेत पालिकेच्या शैक्षणिक सुविधा वाढल्या नाहीत. शहराची लोकसंख्या जवळपास पाच लाखांच्या घरात आहे.वाढत्या लोकसंख्येमुळे विद्यार्थी संख्या वाढणे नैसर्गिक आहे.ठाणे महापालिकेच्या मराठी,हिंदी,इंग्रजी माध्यमाच्या शाळा या वाढत्या लोकसंख्येला पुरेशा आहेत का?याचा विचार होणे गरजेचे आहे.विद्यार्थ्यांच्या संख्येने शाळा आणि वर्ग नसल्याने नाईलाजाने येथील पालक आपल्या पाल्याला खासगी शाळेत प्रवेश घेऊन देतात. इथे तर अजून एक संकट पालक आणि विद्यार्थी यांची वाट पाहते. ज्या शाळेत आपल्या मुलांचे भविष्य घडण्यासाठी आपण मुलांना पाठवतो त्या शाळेलाच कोणते भविष्य नाही हे पालकांना माहीतच नसते.४५ शाळा अनधिकृत असतील तर या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलांच्या आयुष्याशी फसवणूक करणाऱ्यांवर आजपर्यंत काय ठोस कारवाई झाली याचे उत्तर मिळायला हवे. बरं या अनधिकृत किंवा परवानगी नसणाऱ्या शाळा सुरू राहण्याला कुणाचा आशीर्वाद आहे?याचा शोध पालिका प्रशासनाने घ्यायला हवा. सामान्य माणसाच्या मुलांचे शैक्षणिक भविष्य धोक्यात आणणाऱ्यांवर कारवाई व्हायला हवी.पालिकेचा शैक्षणिक विभाग हे धाडस दाखवणार आहे का? हा दिवेकरांचा प्रश्न आहे.

# विनाहेल्मेट आलेल्या २५४ दुचाकीस्वारांवर आरटीओची कारवाई

**ठाणे : एकीकडे ठाणे प्रादेशिक परिवहन विभागाने (आरटीओ) हेल्मेट सक्ती ही शासकीय नाहीतर खाजगी आस्थापना केली. त्याबाबत जनजागृतीवर भर दिला. तसेच त्याचे फलक प्रवेशद्वारावर लावले तरीही अजून दुचाकीस्वार त्याच्याकडे कानाडोळा करताना दिसत आहेत. ही बाब नुकतीच आरटीओने ९०० आस्थापना येथील सीसीटीव्ही कॅमेरे तपासणी मोहिमेत समोर आली आहे. त्यामध्ये विनाहेल्मेट एण्ट्री करणाऱ्या २५४ दुचाकीस्वारांवर दंडात्मक कारवाई केली आहे.**



## ९०० आस्थापनांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे तपासणी मोहिमेला सुरवात



> *रस्ते अपघातात दुचाकीची वाढती संख्या अधिक आहे. तर ठाण्यातील शासकीय कार्यालय आणि अधिक खाजगी आस्थापनात दुचाकी घेऊन येणाऱ्या सर्वांना हेल्मेट सक्तीचे आहे. तरच प्रवेश द्यावा य याबाबतचे परिपत्रक प्रादेशिक परिवहन विभागाने दिले आहे. त्यानुसार रस्ते नियम मोडणाऱ्या दुचाकींवर कारवाई केली जात आहे. आतापर्यंत २५६ जणांवर ही कारवाई केली आहे.*
>
> **–जयंत पाटील,**
> *उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे*

दुचाकी चालवताना हेल्मेट घालण्याबाबत वारंवार आवाहन करण्यात येत आहे. तरीसुद्धा दुचाकीस्वारांकडून त्या आवाहनाला गांभीर्याने घेताना दिसत नाहीत. त्यामुळे रस्ते अपघाताच्या संख्येत दुचाकीस्वारांची संख्या वाढत असून त्यात विना हेल्मेट दुचाकीस्वरांच्या मृत्यूचे प्रमाण अधिक असल्याचे एका अहवालात समोर आले आहे. हे प्रमाण कमी करण्याबरोबर सुरक्षेच्या दृष्टीने ठाणे प्रादेशिक परिवहन विभागाने काही दिवसांपूर्वी ठाण्यातील शासकीय कार्यालय खाजगी कंपनी, गृहसंकुल आदींना लेखी सूचना दिली आहे. तसेच याबाबत जनजागृती केली. मात्र त्या सूचनांकडे दुर्लक्ष करणाऱ्या दुचाकीस्वारांवर आता कारवाईची मोहीम हाती घेतली आहे. यासाठी तब्बल ९०० आस्थापना येथील सीसी टीव्ही फुटेज तपासून आस्थापनात विना हेल्मेट आलेल्या त्या २५४ दुचाकीस्वारांवर दंडात्मक कारवाई केली. यामध्ये महापालिका, पोस्ट ऑफिस, जिल्हा परिषद आदी सरकारी कार्यालयात ६७ तर खाजगी आस्थापनात ८३५ सीसी फुटेज प्रत्यक्ष तपासणी चालू केली असून त्यामध्ये आत्तापर्यंत विनाहेल्मेट आलेल्या २५४ दुचाकीस्वारांवर कारवाई केल्याचे सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी प्रसाद नलवडे सांगितले.

**संपादक**
सुहास खंडागळे
**व्यवस्थापक**
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१
**छायाचित्रकार/प्रतिनिधी**
सुदेश सकपाळ
**वितरण प्रतिनिधी**
संतोष मदने
**ऑफीस पत्ता :-**
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिश्चंद्र अपार्टमेंटच्या मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२.

# स्वातंत्र्यदिनी होणार ठाणे आपत्ती प्रतिसाद दलातील जवानांचा सन्मान

**ठाणे :ठाणे शहरासह महाराष्ट्रात अन्य ठिकाणी उद्भवलेल्या आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी ठाणे महानगरपालिकेच्या ठाणे आपत्ती प्रतिसाद दलाचे जवान नेहमीच मदतकार्यात पुढाकार घेवून आपला जीव धोक्यात घालून नागरिकांना सहकार्य करीत असतात. या जवानांचा सन्मान व्हावा किंबहुना त्यांच्या कार्याचे कौतुक करण्यात येणार आहे. येत्या १५ ऑगस्ट रोजी रात्री १२ वाजता ( १४ ऑगस्ट रोजी मध्यरात्री) तलावपाळी येथील शिवसेना ठाणे जिल्हा शाखा येथे ध्वजारोहणानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ठाणे आपत्ती प्रतिसाद दलाचा गौरव केला जाणार असल्याची माहिती शिवसेना ठाणे जिल्हाप्रमुख नरेश म्हस्के यांनी दिली.**



ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल च्या धर्तीवर ठाणे आपत्ती प्रतिसाद दलाची निर्मिती सन २०१७ मध्ये करण्यात आली. या दलात ३३ प्रशिक्षित जवान कार्यरत आहेत. ठाणे आपत्ती प्रतिसाद दलाचे कार्यालय हे २४७ सुरू असून ठाणे आपत्ती प्रतिसाद दल ठाणे शहरात तसेच जिल्हयामध्ये कोणत्याही प्रकारची नैसर्गिक आपत्ती अथवा मानवनिर्मित आपत्ती उद्भवल्यास घटनास्थळी जाऊन शोध व बचावकार्ये तसेच नागरिकांच्या मालमत्तेचे रक्षण करण्याचे कार्य करतात. स्वत:चा जीव धोक्यात घालून प्रसंगी तहानभूक विसरुन बचावकार्य करणाऱ्या या जवानांबद्दल ठाणेकरांना अभिमान असून या जवानांचे कौतुक व्हावे किंबहुना त्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी शिवसेना ठाणे जिल्हा शाखेतर्फे या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती नरेश म्हस्के यांनी दिली.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
**संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज

ताज्या घडामोडी वाचण्यासाठी लॉग इन करा
www.diwanews.com

सोमवार, ७ ऑगस्ट २०२३


# दिव्यात कै. लक्ष्मण शंकर म्हात्रे यांच्या जयंती दिनानिमित्त भव्य मोफत आरोग्य शिबिर संपन्न







**ठाणे:–**दिवा येथे शिवदत्त ज्ञान प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष कै. लक्ष्मण शंकर म्हात्रे यांच्या जयंती दिनानिमित्त शिवदत ज्ञान प्रसारक मंडळ, रोटरी क्लब ऑफ दिवा ठाणे, ठा.म.पा. धर्मवीर उपचार केंद्र व छत्रपती शिवाजी महाराज हॉस्पिटल कळवा यांच्या संयुक्त यांच्या विद्यमानाने मोफत भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

सदर शिबिरात हदयरोग चिकित्सा, मूत्रपिंड चिकित्सा, इ.सी.जी., डोळे तपासणी, रक्त तपासणी, व मोफत चष्म्याचे वाटप करण्यात आले. शिबिरामध्ये संबंधित विभागाचे तज्ञ डॉक्टर उपस्थित होते. या शिबिरामध्ये दिव्यातील अनेक भागातील ३७५ लोकांनी मोफत आरोग्य तपासणीचा उपचाराचा लाभ घेतला. तर शिबिरामध्ये परिसरातील २२८ नागरिकांना मोफत चष्म्याचे वाटप करण्यात आले. तसेच या उपक्रमांत प्रभागातील शेकडो नागरिक व महिला सहभाग नोंदवला.या प्रसंगी नागरिकांना मोफत आधार कार्ड काढण्याचे कॅम्प ही आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी संस्थेच्या अध्यक्ष सौ. लीलाबाई लक्ष्मण म्हात्रे उपस्थित होत्या. तसेच शिबिर यशस्वी करण्यासाठी शिवदत्त म्हात्रे, दिनेश म्हात्रे, साईनाथ म्हात्रे, गीता म्हात्रे, केतकी म्हात्रे, रोटरी क्लब ऑफ दिवाचे हर्षद भगत, आदित्य पाटील, स्वप्निल गायकर, युवराज बेडेकर, वैष्णव पाटील, किशोर पाटील, महेंद्र दळवी, संतोष भगत, आणि संस्थेचे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

# दिव्यात लहान मुलांच्या दफन भूमीसाठी जागा उपलब्ध करून द्या,वंचित आघाडीची मागणी

**दिवा:–** दिवा शहरात लहान मुलांच्या मृत्यूनंतर त्यांचे अंत्यसंस्कार करण्यासाठी दफनभूमी नाही,परिणामी ठाणे महापालिकेने दिवा शहरात मृत्युमुखी पडणाऱ्या लहान मुलांच्या अंत्यसंस्कार करण्यासाठी दफनभूमी उपलब्ध करून द्यावी अशी मागणी दिवा शहर वंचित आघाडीने केली आहे.

दिवा विभाग हा प्रभाग ठाणे महापालिकेच्या क्षेत्रात समाविष्ट करन्या अगोदर अनेक गावखेडी ही स्वतंत्र होते. दिवा गावचे शहरात रुपांतर झाले आहे. परिणामी लोकसंख्या ही जवळपास पाच ते सहा लाखाच्या घरात गेली आहे. परिणामी या विभागात लहान मुलांची दफन भूमी आज पर्यंत उपलब्ध नाही. अशावेळी कुणाच्या घरी लहान बाळाचा मृत्यू झाला. तर त्याला दफन करण्यासाठी अनेक समस्या निर्माण होतात. ठाणे, मुंब्रा किंवा मुंबई या ठिकाणी घेऊन जावे लागते. अनेक वेळा लहान मुलांच्या दफन करण्यात आलेल्या शरीराचे लचके भटक्या कुत्र्यांकडेन तोडले जातात. या सर्व गोष्टी लक्षात घेता विभागात लहान मुलांची दफनभूमी असणे गरजेचे आहे अशी मागणी करणारे पत्र वंचित बहुजन आघाडी दिवा विभागाच्या वतीने दिवा प्रभाग समितीस देण्यात आले आहे. ठाणे महापालिकेच्या मालकीची जागा लहान मुलांच्या दफनभूमीसाठी उपलब्ध करून देण्याबाबत वंचित बहुजन आघाडीचे दिवा शहर अध्यक्ष मिलिंद गवई, सुधाकर कांबळे, अरविंद कदम, शारदाताई धनवे, अडसुळे, यांनी निवेदन दिले आहे.



# भाजपच्या माध्यमातून आयोजित कजरी महोत्सव उत्साहात साजरा

**दिवा:-** भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून दिवा शहरात कजरी महोत्सव २०२३ चे आयोजन करण्यात आले होते. रविवारी सकाळी ११ ते ३ या वेळात अवधूत हॉल येथे सदर कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.यावेळी भारतीय जनता पार्टीचे दिवा शहरातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.
















# गणेश उत्सवापूर्वी मुंबई-गोवा हायवेवरील खड्डे बुजवा

## सामाजिक कार्यकर्ते राजकांत पाटील यांची मागणी

*__ठाणे:-__ दरवर्षीप्रमाणेच मुंबई गोवा हायवे ची यावर्षीही मोठ्या प्रमाणात दुरावस्था झाली असून पनवेल ते माणगाव हा प्रवास नागरिकांसाठी जीवघेणा ठरत आहे.कोकणात मोठ्या संख्येने गणेशोत्सवासाठी जाणाऱ्या चाकरमान्यांना या खड्ड्यांचा होणारा त्रास लक्षात घेता गणेशोत्सवा आधी संपूर्ण रस्ता दुरुस्त करण्यात यावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते राजकांत पाटील यांनी केली आहे.*

*मुंबई गोवा हायवे ची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे. या रस्त्यावर प्रवास करताना मोठमोठ्या खड्ड्यांमुळे अपघाताची शक्यता असते. त्याशिवाय वाहनांची देखील नादुरुस्ती होण्याची शक्यता असते. पनवेल ते माणगाव दरम्यान कोलाड,नागोठणे या भागात भले मोठे खड्डे असून यामधून वाहन चालक जीव मुठीत घेऊन वाहने चालवत असतात. तरी प्रशासनाने खड्डे तातडीने बुजून नागरिकांना दिलासा द्यावा .गणेशोत्सव जवळ असून यावेळी मोठ्या प्रमाणात चाकरमानी कोकणात जात असतात त्याआधी हे खड्डे बुजवण्यात यावे अशी मागणी राजकांत पाटील यांनी केली आहे.*

# संजय वाघुले यांचे नेतृत्व सर्व समावेशक, दिवा भाजप अधिक जोमाने काम करेल!



## दिवा भाजपच्या ज्योती पाटील यांनी व्यक्त केला विश्वास

दिवा:- भाजपचे नवनियुक्त ठाणे जिल्हा अध्यक्ष संजय वाघुले हे सर्व समावेशक नेतृत्व असून तळागाळातील कार्यकर्त्याला न्याय देण्याच्या त्यांच्या भूमिकेमुळे दिवा भाजप अधिक जोमाने काम करेल असा विश्वास दिवा भाजपच्या महिला अध्यक्षा ज्योती पाटील यांनी व्यक्त केला आहे.

दिवा भाजपच्या महिला अध्यक्षा ज्योती पाटील यांनी दिवा शहर मंडळ अध्यक्ष रोहिदास मुंडे यांच्यासह नुकतीच संजय वाघुले यांची ठाणे येथे मध्यवर्ती कार्यालयात जाऊन सदिच्छा भेट घेऊन वाघुले यांचे अभिनंदन केले. यावेळी ठाणे जिल्हाध्यक्ष संजय वाघुले यांनी दिव्यातील नागरिकांचे प्रश्न जाणून घेतले व जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी मार्गदर्शन केले. त्याचबरोबर दिव्यात भाजपची पक्ष संघटना मजबूत असून ती अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने नवनियुक्त जिल्हाध्यक्ष संजय वाघुले यांनी मार्गदर्शन केले.

भाजपचे पक्षनेतृत्व हे कार्यकर्त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहते असा विश्वास ज्योती पाटील यांनी या भेटीनंतर व्यक्त केला.नवनियुक्त जिल्हाध्यक्ष संजय वाघुले हे सर्व समावेशक आणि सर्वांना सोबत घेऊन जाणारे नेतृत्व असल्याने येणाऱ्या काळात त्यांच्या नेतृत्वाखाली ठाण्यासह दिवा शहरातही भाजप जोमाने वाढेल असा विश्वास ज्योती पाटील यांनी यावेळी व्यक्त केला आहे.

# नवीन फिडरमुळे ठाणेकरांना होणार अखंडित वीजपुरवठा

## ठामपा आणि महावितरणच्या वादावर आमदार संजय केळकर यांचा उतारा

**ठाणे:** महावितरण आणि ठाणे महापालिकेचे नगर अभियंता यांच्यातील वादामुळे गेले काही महिने वीज पुरवठा खंडीत होण्याचे प्रकार घडत होते. ठाणे शहर मतदार संघाचे आमदार संजय केळकर यांच्या शिष्टाईमुळे नवीन फिडर टाकण्याचे काम लवकरच सुरू होऊन ठाणेकरांना अखंडित वीज पुरवठा होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

ठाणे पूर्वेकडील अष्टविनायक चौकात असलेल्या विद्युत फिडरमध्ये बिघाड होत असल्याने गेल्या काही महिन्यापासून ठाण्यात वीजेचा लपंडाव सुरू आहे. या एकाच फिडरवरून संपुर्ण शहरात वीज पुरवठा सुरु आहे. दुसऱ्या ठिकाणी पर्यायी सुविधा उपलब्ध नसल्याने ही समस्या उद्ववली होती. महावितरणने अष्टविनायक चौकात खोदकाम करण्यास परवानगी मागितली होती. परंतु महापालिकेच्या नगर अभियंत्यांनी परवानगी नाकारल्याने अखंडीत वीज पुरवठा करता येत नसल्याचे महावितरणने स्पष्ट केले होते. सहा महिन्यांपासून ही दफ्तर दिरंगाई सुरु होती. आता पावसाळा आल्याने काम करता येणार नसल्याचा पवित्रा महावितरणने घेतला होता.

ठाणे महापालिका आणि महावितरण यांच्यातील वादामुळे लाखो ठाणेकरांना वेठीस धरले गेले होते. अखेर आमदार केळकर यांनी आयुक्तांच्या दालनात महावितरण आणि महापालिका अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक बोलावुन ही समस्या तडीस नेली.



### पुढील आठवड्यात होईल कामाचा श्रीगणेशा

खोदकामास महापालिकेची परवानगी मिळाली असून महावितरणने जे पैसे भरायचे आहेत ते भरून लवकरात लवकर काम सुरू करण्याचा निर्णय झाला आहे. त्यामुळे पुढच्याच आठवड्यात अष्टविनायक चौकात फिडरचे काम करण्यासाठी खोदकाम सुरु होणार असून ठाणेकरांना अखंडीत वीज पुरवठा होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे, अशी माहिती आमदार केळकर यांनी दिली.

# शैलेश पाटील यांचे बनावट इंस्टाग्राम अकाउंट उघडून बदनामीचा प्रयत्न

## पाटील यांच्याकडून पोलिसांत तक्रार

**दिवा:-** शिवसेनेचे दिव्यातील उपशहर प्रमुख व माजी नगरसेवक शैलेश पाटील यांच्या नावे इंस्टाग्राम वर बनावट अकाउंट उघडून चुकीचा वापर केला जात असल्याची तक्रार शैलेश पाटील यांनी मुंब्रा पोलिसांकडे केली आहे.

७००० या नावाने माजी नगरसेवक शैलेश पाटील यांचे इंस्टाग्राम वर अधिकृत खाते असून या खात्याचे अनेक फॉलोवर्स आहेत.मात्र शैलेश पाटील यांच्या नावे_७००० असे बनावट खाते उघडून व त्यांचा फोटो वापरून इंस्टाग्राम वर दुसरे खाते उघडण्यात आले आहे. या अज्ञात इसमाने या खात्याद्वारे चुकीचा वापर सुरू केल्याची तक्रार शैलेश पाटील यांनी केली आहे. सदर बनावट इंस्टाग्राम खाते अज्ञात व्यक्ती चालू बंद करत असून सदर व्यक्तीवर सायबर पोलिसांच्या मदतीने कठोर कारवाई करावी व सदर खाते बंद करावे अशी मागणी माजी नगरसेवक शैलेश पाटील यांनी मुंब्रा पोलिसांकडे केली आहे.

# क्लस्टर योजनेत ठाणे महानगरपालिका आणि महाप्रीत यांच्यात सामान्य निर्णायक करारावर स्वाक्षऱ्या



**ठाणे (प्रतिनिधी) : आशिया खंडातील सर्वात मोठी, महत्वाकांक्षी व ऐतिहासिक समूह विकास योजना (क्लस्टर) ठाण्यात मूर्त रुप घेत आहे. या योजनेच्या पहिल्या टप्प्यातील काम किसननगरमध्ये सुरू झाले आहे. त्याच टप्प्यातील टेकडी बंगला, हाजुरी व किसननगर क्लस्टरचा काही भाग विकसित करण्यासाठी ठाणे महानगरपालिकेने बुधवारी महात्मा फुले नुतनीय उर्जा व पायाभूत सुविधा तंत्रज्ञान लिमिटेड (महाप्रीत) या शासकीय संस्थेसह करार केला.**

ठाणे महानगरपालिका आणि महाप्रीत या दोन संस्थांमधील सामान्य निर्णायक करारावर ( ) महापालिका आयुक्त अभिजीत बांगर आणि महाप्रीतचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक बिपीन श्रीमाळी यांनी सह्या केल्या.

अनधिकृत व अधिकृत धोकादायक इमारतीचा सामूहिक पुर्नविकास करण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून नियमावली तयार करण्यात आली आहे. महानगरपालिका क्षेत्रातील मुलभुत सुविधांचा अभाव असलेल्या भागाचा तसेच धोकादायक व जुन्या इमारतींचा पुनर्विकास करण्यासाठी अशा क्षेत्रात नागरी पुनरुत्थान योजना (क्लस्टर) राबविण्यासाठीची नियमावली एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमध्ये समाविष्ट करण्यात आली आहे. त्या नियमानुसार ठाणे महानगरपालिकेकडून आतापर्यंत एकूण ४५ नागरी पुनरुत्थान आराखडे () अधिसूचित करण्यात आलेले आहेत. अधिसूचित एकूण ४५ क्लस्टरपैकी सहा क्लस्टरबाबतची अंमलबजावणी प्राधान्याने करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. त्यात, -१-कोपरी, -३-राबोडी, -१२-किसननगर, -१३-लोकमान्यनगर, -११-हाजुरी, -६-टेकडी बंगला यांचा समावेश आहे.

महाप्रीत ही कंपनी गृहनिर्माण क्षेत्रातील परवडणारी घरे, शहरी व प्रादेशिक नियोजन तसेच पायाभूत सुविधा विकास इ. क्षेत्रात कार्यरत आहे. तसेच महाप्रीत संस्थेकडे प्रधानमंत्री आवास योजना, आर्थिक दुर्बल घटकांसाठी गृहनिर्माण प्रकल्प अशा अनेक अंतर्गत प्रकल्पाचा अनुभव आहे. त्यामुळे सदर संस्थेमार्फत क्लस्टरच्या अंमलबजावणीस चालना मिळणार आहे.

ठाणे शहरात मोडकळीस आलेल्या धोकादायक अनधिकृत व अधिकृत इमारतींचा सुनियोजित व संपूर्ण नागरी पायाभूत सुविधांसह पुनर्विकास व्हावा यासाठी एकूण ४५ नागरी पुनरुत्थान आराखडे तयार करण्यात आले असून त्याचे एकूण क्षेत्रफळ १५०० हेक्टर एवढे आहे. या ४५ आराखड्यापैंकी अत्यंत दाटीवाटीचे क्षेत्र असलेल्या किसननगर नागरी पुर्नरुत्थान आराखडा क्र. १२ मधील नागरी पुर्नरुत्थान योजना क्र. १ व २ च्या कामाचा प्रत्यक्ष मुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ०५ जून रोजी शुभारंभ झाला. या कामाची सुरूवात अंतिम भूखंड क्र. १८६/१८७ या वरील ७७५३ चौ. मी क्षेत्रफळावरील भूखंडावर त्याचप्रमाणे रस्ता क्रमांक २२लगतचा भूखंड क्रमांक एफ - ३ या ठिकाणी १९२७५ चौ. मी. एवढया जागेवर करण्यात आली. नागरी पुनरुत्थान १ व २ ची अंमलबजावणी सिडको या शासनाच्या कंपनीमार्फत होत आहे.

अनेक वर्षे नागरिक प्रतीक्षा करीत असलेल्या क्लस्टर योजनेचा प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू झाल्याने व त्याची अंमलबजावणी कालबद्ध पध्दतीने पूर्ण होणार असल्याने अधिकृत व मालकी हक्काच्या घरात राहण्याचे नागरिकांचे स्वप्न लवकरच साकार होणार आहे.

त्याप्रसंगी, अतिरिक्त आयुक्त (२) श्री. प्रशांत रोडे, उपसंचालक नगर रचना प्रदीप गोहील, कार्यकारी अभियंता महेश रावळ, महाप्रीत संस्थेचे विजयकुमार पाटील, पुरुषोत्तम जाधव, प्रशांत गेडाम, रवींद्र चव्हाण, सुभाष नागे व सुनील पोटे तसेच ठाणे महानगरपालिकेचे तांत्रिक सल्लागार संजय देशमुख व त्यांचे सहाय्यक सागर पवार उपस्थित होते.

## योजनेची वैशिष्ट्ये

*अनधिकृत इमारतीसह वसाहतीचा टाऊनशीप धर्तीवर एकत्रित पुनर्विकासाचा प्रकल्प, मोडकळीस आलेल्या घरातून थेट सुरक्षित व सुनियोजित संकुलामध्ये घर, पात्र निवासी लाभधारकास विनामूल्य ३२३ चौ. फूट मालकी हक्काचे घर, प्रत्येक सेक्टरमध्ये सण, उत्सव, धार्मिक कार्यक्रम सामाजिक उपक्रमांसाठी विशेष जागा, प्रत्येक सेक्टरमध्ये वाचनालय, व्यायामशाळा, आरोग्यकेंद्र आणि कम्युनिटी सेंटरची व्यवस्था, पाळणाघरासह महिला सक्षमीकरण केंद्र आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र, अरुंद रस्ते आणि गजबजलेल्या गल्लीऐवजी प्रशस्त व दर्जेदार रस्ते आणि वाहतूक सुविधा, पाणीपुरवठा, मल व जलनि:स्सारण, घनकचरा व्यवस्थापनासह पायाभूत सुविधा, पुनर्विकसित टाऊनशीप आराखड्यामध्ये सुसज्ज आरोग्य, शैक्षणिक, क्रीडा, मनोरंजन, उद्यान पार्किंग, मंडई आदि नागरी सुविधांचा समावेश या योजनेत आहे. प्रख्यात वास्तुविशारद हाफिज कॉन्ट्रॅक्टर यांच्या डिझाईननुसार टाऊनशीपची उभारणी केली जात आहे.*

# बदलत्या ठाण्याचा रंग उडाला!

## कोट्यावधी रुपये पाण्यात गेल्याचा ठाणे शहर काँग्रेसचा आरोप

## चौकशीची मागणी

**ठाणे (प्रतिनिधी):** ठाण्याचे मुख्यमंत्री झाल्यानंतर मुख्यमंत्र्यांचे बदलते ठाणे अभियानांतर्गत ठाणे शहराचा संपूर्ण कायापालट करण्याच्या अनुषंगाने राज्य सरकारकडून १३० कोटी रुपयांचा निधी ठाणे शहरास देण्यात आला व त्या माध्यमातून विविध कामे सुरू आहेत. शहर सुशोभिकरणाअंतर्गत संरक्षक भिंती आणि दर्शनी भागातील रंगकामासाठी आत्तापर्यंत ३४.६४ कोटी रुपयांचे काम झालेले असून त्याचे देयक अदा करण्यात आलेले आहे. परंतु हे रंगकाम करताना निकृष्ट दर्जाचे रंगकाम साहित्य वापरल्याने पावसाच्या पाण्याने ते रंग वाहून जात अवघ्या काही महिन्यांपूर्वी काढलेले रंग चित्र खराब होत असल्याने जनतेचे कोट्यावधी रुपये अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे पाण्यात जात आहेत.असा आरोप ठाणे शहर काँग्रेसने केला.

ठामपा अधिकाऱ्यांना याचे कुठलेही गांभीर्य नाही. चुकीच्या पद्धतीने होत असलेल्या रंगकामाबाबत, पावसाच्या पाण्यात वाहून जात खराब होत असलेल्या रंगचित्रे व रंगकामाबाबत या प्रकल्पावरील कार्यकारी अभियंता,उप अभियंता यांना पत्राद्वारे, फोनद्वारे,व्हाट्सअप द्वारे, प्रत्यक्षदर्शी छायाचित्रांसह तक्रारी दाखल करत विचारणा केली असता एखाद टक्का असेल की अशी उत्तरे अधिकारी देतात, याबरोबरच रंगकामाबाबत माहिती अधिकारात विचारलेल्या प्रश्नांना देखील चुकीची व दिशाभूल करणारी उत्तरे मिळत असल्याचा आरोपही काँग्रेसचे प्रवक्ते राहुल पिंगळे यांनी केला आहे. त्यामुळे आयुक्तांनी हा विषय गांभीर्याने घेत शासनाने दिलेल्या नियम व अटींचे उल्लंघन करत निकृष्ट दर्जाची रंगचित्रे रंगकामाची चौकशी करून ठेकेदारास काळ्या यादीत टाकावे व याची पर्यवेक्षणीय जबाबदारी असलेल्या अधिकाऱ्यांना निकृष्ट दर्जाचे चुकीचे काम होऊनही दुर्लक्ष केल्याने त्यांच्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई करावी अशी मागणी पिंगळे यांनी आयुक्तांकडे पत्राद्वारे केली आहे.

**मुख्यमंत्र्यांच्या बदलत्या ठाण्यात**

**महानगरपालिका आयुक्त बैठकीत कारवाईची घोषणा करतात. परंतु कामात निष्काळीपणा करणाऱ्या कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर कुठली कठोर कारवाई होत नसल्याने ते बिनधास्त आहेत. त्यामुळे आयुक्तांनी स्वत: प्रत्यक्ष रंग–कामाच्या दुरवस्थेबाबत पाहणी दौरा करून कारवाईचा बडगा उगारावा.**

**– राहुल पिंगळे, काँग्रेस प्रवक्ते**

## मुख्यमंत्र्यांचे बदलते ठाणे उपक्रम, रंगरंगोटीचा रंग पहिल्याच पावसात होतोय खराब!

# ‘तन्वी फाउंडेशन’च्या वतीने महिलांसाठी मोफत सिनेमा शोचे आयोजन




**दिवा:– तन्वी फाउंडेशन व तन्वी महिला बचत गट यांच्या माध्यमातून सौ.ज्योती राजकांत पाटील यांच्या वतीने शहरातील महिलांना बाईपण भारी देवा हा चित्रपट मोफत दाखविण्यात आला. महिलाना रोजच्या धकाधकीच्या जीवनात आनंद मिळावा,मनोरंजन व्हावे या हेतूने हा उपक्रम राबविण्यात आल्याचे ज्योती पाटील यांनी सांगितले.**



# पालकाला मारहाण करणाऱ्या शाळा प्रशासनाला मनसेने विचारला जाब



**दिवा:–** भर रस्त्यात एका पालकाला मारहाण करणाऱ्या आर एल पी शाळेच्या कर्मचाऱ्यांना जाब विचारण्यासाठी मनसेने थेट शाळेत धडक दिली.शहरातील मुंब्रादेवी कॉलनी येथील आर.एल.पी शाळेतील कर्मचाऱ्यांकडून पालकाला मारहाण करीत असल्याचा व्हिडीओ सोशल माध्यमांवर प्रसारित झाल्यानंतर मनसे दिवा शहर अध्यक्ष तुषार भास्कर पाटील यांच्या सूचनेनुसार मनविसे विभाग अध्यक्ष कुशाल पाटील यांनी तात्काळ आपल्या सहकाऱ्यांसोबत संबंधित शाळेवर धडक दिली.झाल्या प्रकारा बद्दल शाळेतील कर्मचाऱ्यांना मनसे स्टाईल जाब विचारल्यानंतर शाळा कर्मचाऱ्यांनी घडलेल्या प्रकाराबद्दल माफी मागितली. यावेळी मारहाण झालेले पालक उपस्थित नसल्याने त्यांची बाजू समजून घेऊन शाळेवर कारवाई करण्याची मागणी करणार असल्याचे कुशाल पाटील यांनी सांगितले. यावेळी त्यांच्या सोबत मनविसेचे उपविभाग अध्यक्ष गौरव कदम,शाखाध्यक्ष ज्ञानेश्वर आगवणे, परेश म्हात्रे आणि उपशाखाध्यक्ष निखिल पाटील हे पदाधिकारी उपस्थित होते.

# दिव्यात शिवसेनेला अंगावर घेणाऱ्या रोहिदास मुंडे यांचे मंडळ अध्यक्ष पद जाण्याची राजकीय वर्तुळात चर्चा!

**दिवा:–** भाजपने राज्यात अनेक ठिकाणी जिल्हाध्यक्ष बदलल्यानंतर ठाण्यातही नव्या जिल्हाध्यक्षांची नियुक्ती झाल्यानंतर आता दिव्यात भाजपचा मंडल अध्यक्ष बदलला जाणार अशी चर्चा दिवा शहराच्या राजकीय वर्तुळात आहे.

विशेषतः ही चर्चा शिवसेनेच्या गटातून बोलली जात असल्याने दिवा शिवसेनेच्या दबावातून ठाणे भाजप दिवा शहर मंडळाध्यक्ष बदलणार का?असा प्रश्न उपस्थित होत आहे. दिवा शहरातील भाजपचे मंडळ अध्यक्ष रोहिदास मुंडे हे स्थानिक पातळीवर नागरी प्रश्नांवर आक्रमक भूमिका घेत शिवसेनेला अंगावर घेत आहेत.दिव्यात २०१७ प्रमाणेच भाजप स्वतंत्र लढल्यास भाजपला चांगले यश मिळेल असा दावा करत मुंडे यांनी वेळोवेळी आक्रमक भूमिका घेतली आहे. पक्ष वाढीसाठी कायमच येथील शिवसेने विरोधात रोहिदास मुंडे यांनी जनतेच्या वतीने संघर्षाची भूमिका घेतलेली आहे.हीच संघर्षाची भूमिका दिव्यात शिवसेनेला अडचणीची ठरली आहे. भाजप हे शिवसेनेच्या हातचे बाहुले होऊ देणार नाही अशी भूमिका रोहिदास मुंडे यांनी मागील वर्षभरापासून घेतली आहे.भाजपचे दोन मंडल अध्यक्ष शिवसेनेने पळवल्यानंतर यापुढे दिव्यातील शिवसेनेसमोर भाजपने झुकायचे नाही असा पवित्रा घेणाऱ्या रोहिदास मुंडे यांचेच मंडळ अध्यक्ष पद काढून नवीन मंडल अध्यक्ष नेमला जाण्याची चर्चा दिव्याच्या राजकीय वर्तुळात रंगली आहे.भाजपमध्ये देखील रोहिदास मुंडे यांच्या जागी मंडळ अध्यक्ष होण्यासाठी काहीजण इच्छुक असल्याची माहिती सूत्रांकडून कळते.